# कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर (महाराष्ट्र)
# पुर परिस्थिती तसेच जोराच्या पावसानंतर
# विविध पीके वाचवण्यासाठी शेतक-यांसाठी कृषि सल्ला

**सामान्य सल्ला:**

- पावसाची शक्यता असल्याने उभ्या पिकांमध्ये, फळबागांमध्ये तसेच भाजीपाला पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व शेतातील अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा करावा (पिकात साचलेले अतिरिक्त पाणी शेताबाहेर काढून द्यावे).
- तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वत:ची तसेच आपल्या जनावरांची काळजी घ्यावी व जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत.
- पावसाची शक्यता असल्याने पक्व पिकाची त्वरित काढणी करावी. काढणी केलेले पिके शेड मध्ये किंवा प्लास्टीकच्या कागदाने सुरक्षित झाकून ठेवावीत.
- तुरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, विजासह पावसाची शक्यता असल्याने फळबागांना आधार द्यावा.
- पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून, जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास, विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.
- पावसाची शक्यता असल्याने फवारणी करताना स्टिकर, मिनरल ओईल इ. वापरावे.
- कीटकनाशक आणि तणनाशकाची फवारणी करताना वेगवेगळी करावी.
- सतत आणि अधूनमधून पडणा-या पावसामुळे तण मोठ्या प्रमाणावर वाढतात आणि त्याच्या नियंत्रणासाठी ग्लायफोसेट 41% ईसी 2 ते 4 लिटर प्रति हेक्टर 500-700 लिटर पाण्यात मिसळून फवारणी करा, स्टिकर वापरा आणि पाऊस नसताना फवारणी करा.
- रब्बी हंगामासाठी शेत तयार करावे जेणेकरून रब्बी पिकांची पेरणी वेळेवर करता येईल.

- सध्याच्या ढगाळ व पावसाळी हवामानामुळे रोगांच्या नियंत्रणासाठी फळबागेमध्ये 0.5 ते 1 टक्के बोर्डो ची फवारणी करावी.
- भाजीपाला पीके जसे वांगी, भेंडी, गवार इ. लागवडीनंतर रसशोषक किडींच्या जैविक नियंत्रणासाठी पीकाच्या अवस्थेनुसार पिवळे चिकट सापळे, सापळा पीके, जैविक बुरशीनाशके (मेटारायझीयम, ट्रायकोग्रामा, व्हरटीसिलीयम इ.) यांचा वापर करावा आवश्यकता असल्यास रासायनिक कीड आणि बुरशीनाशकाचा वापर करावा.
- हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानाचा पूर्वानुमाना करिता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.
- मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा.

**ऊस:**

- ऊस पिकातील साठून राहिलेले पाणी शेता बाहेर काढून देण्याची व्यवस्था करावी. ऊसाच्या बुडक्याकडील वाळलेली पाने काढून ती सरीत टाकून स-यानमध्ये हवा खेळती ठेवावी. अतिवृष्टी व पूरामुळे पडलेले ऊस उभे करून ते एकमेकात बांधून घ्यावेत, जेणेकरून ऊसाच्या कांड्या जमिनीला चिकटून कांड्यावर मुळ्या अथवा पांगशा फुटणार नाहीत. अतिवृष्टी व पूरबाधित क्षेत्रातील ऊसाला एकात्मिक खत व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा अवलंब करावा. त्यासाठी सेंद्रिय, जैविक व रासायनिक खतांच्या शिफारशीप्रमाणे खते द्यावीत. ऊसासाठी एकरी 8-10 किलो झिंक सल्फेट शेणखतामध्ये अथवा गांडूळ खतामध्ये मिसळून द्यावे.

**रब्बी हंगाम पुर्वतयारी :**

- शेतकरी बांधवानी रबी हंगामासाठी पूर्वतयारी म्हणून पिकांची निवड, पिकांच्या वाणांची निवड, त्या पिकासाठी योग्य जमीन निवडणे व सर्व इतर नियोजन करावे. पेरणीसाठी सुधारित / संकरित वाणांचे बियाणे शासकीय यंत्रणेकडून / कृषि विद्यापीठांच्या विक्री केंद्राकडून उपलब्ध करून ठेवावे. वाफसा येताच शेत जमीन तयार असल्यास रबी पिके जसे ज्वारी, हरभरा, करडई इ. पिकांची बीजप्रक्रिया करून पेरणी करावी.

**सोयाबीन (पक्वता ते काढणी अवस्था)**

- सोयाबीनच्या शेंगांचा रंग पिवळट तांबुस झाल्यानंतर, पावसाची शक्यता असल्याने लवकर काढणीस सुरूवात करावी. पीक काढणीस उशीर झाल्यास शेंगा फुटण्यास सुरूवात होऊ शकते. पक्व पिकाची काढणी करून काडाचे छोटे छोटे ढीग करून प्रखर सूर्यप्रकाशात शेतातच वाळवावेत. त्यानंतर प्रादुर्भाव / उगवण झालेल्या शेंगा बाजूला काढून मळणी यंत्राची कमी स्पीड ठेऊन सोयाबीन चांगले व्हाळवावे व ओलावा 12% पेक्षा कमी राहील हे पहावे मळणी करवी.

**मका ( दाणे भरण्याची अवस्था)**

- उभ्या पिकांमध्ये अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क 5% किंवा इमामेक्टीन बेंझोएट 5% एस.जी. 8 ग्रॅम प्रति 10 लिटर पाणी या प्रमाणात पावसाची उघडीप बघून फवारणी करावी तसेच फवारणी करताना स्टिकरचा वापर करावा. मात्र फवारणी केलेल्या मक्याचा वापर जनावरांच्या चा-यासाठी तसेच मका कणसांचा वापर खाण्यासाठी करू नये.

**तूर (फांद्या फुटण्याची अवस्था)**

- शेंडा पोखरणा-या अळीच्या नियंत्रणासाठी 5 टक्के निंबोळी अर्काची किंवा निंबोळीयुक्त किटकनाशक ऍझाडिरेक्टीन 0.03 टक्के (300 पी.पी.एम.) 5 मि.ली. प्रती लिटर पाणी किंवा इंडोक्झाकार्ब 14.5 टक्के एस.सी. प्रवाही 7 मि.ली. किंवा इमामेक्टीन बेंझोएट 5 टक्के एस.जी. 3 मि.ली. प्रती 10 लिटर पाणी या प्रमाणात सकाळी वारा शांत असताना स्टिकर 1 मि.ली. मिसळून प्रती लिटर या प्रमाणे पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. तूर पिकात पाणी साचल्यास फायटॉफ्थोरा करपा रोगाचा प्रादुर्भाव झपाट् याने वाढू शकता, ज्यामुळे खोड व फांद्या करपतात. त्यामुळे शेतात पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. या रोगाच्या व्यवस्थापनासाठी मेटालेक्सिल 4% + मॅन्कोझेब 64% @ 1.5 ग्रॅम / लिटर या प्रमाणात फवारणी स्वच्छ हवामानात करावी.

**रब्बी ज्वारी (पेरणी पूर्व तयारी)**

- जमिनीत योग्य वापसा आल्यानंतर 15 ऑक्टोबर पर्यंत 5 सेमी खोलीवर रब्बी ज्वारीची पेरणी करा. रब्बी हंगामात ज्वारी पेरणीसाठी शिफारस केलेले सुधारित / संकरीत वाण जमिनीच्या प्रकारानुसार वापरावेत. हलक्या जमीनीसाठी फुले अनुराधा, फुले माऊली, फुले यशोमती मध्यम जमीनीसाठी फुले सूचित्रा, फुले माऊली, फुले चित्रा, परभणी मोती, मालदांडी-35-1 भारी जमीनीसाठी फुले वसुधा, फुले यशोदा, सी.एस.व्ही.22, पी.के.व्ही. क्रांती, परभणी मोती, संकरीत वाण: सी.एस.एच.15 आणि सी.एस.एच. 19 बागायती साठी फुले रेवती, फुले वसुधा, सी.एस.व्ही. 18, सी.एस.एच. 15 आणि सी.एस.एच. 19 हुरड् यासाठी वाण : फुले उत्तरा, फुले मधुर. लाहयासाठी वाण फुले पंचमी पापडासाठी वाण फुले रोहिणी. रब्बी ज्वारीचे अपेक्षित उत्पादन मिळवण्यासाठी हेक्टरी 1.48 लाख रोपे ठेवणे जरूरी चे आहे. त्याकरिता ज्वारीची पेरणी 45 x 15 सेमी. अंतरावर करावी. पेरणी पूर्वी प्रती किलो बियाण्यास 4 ग्रॅम गंधक (300 मेश पोताचे) चोळावे, तसेच 25 ग्रॅम ॲझोटोबॅक्टर व पी.एस.बी कल्चर चोळावे. जिवाणू संवर्धकांची प्रक्रिया करून हेक्टरी 10 किलो बियाणे वापरावे.
-

**करडई (पेरणी पूर्व तयारी)**

- जमिनीत योग्य वापसा आल्यानंतर ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत रब्बी करडईची पेरणी करा.
- रब्बी हंगामात करडई पेरणीसाठी शिफारस केलेले सरळ / संकरीत वाणांची निवड करावी. करडईच्या कोरडवाहू क्षेत्रात पेरणीसाठी भीमा, फुले कुसुमा, फुले करडई-733 या वाणांची निवड करावी. कोरडवाहू तसेच बागायती लागवडी साठी एस.एस.एफ.708, फुले चंद्रभागा (एस.एस.एफ.748), फुले निरा एस.एस.एफ-12-40, फुले भिवरा एस.एस.एफ. 13-71, फुले गोल्ड एस.एस.एफ. 15-65, फुले किरण एस.एस.एफ.16-02, नारी-6 (बिन काट् याची, पाकळ्या गोळा करण्यास योग्य) या वाणांची निवड करावी. बियाणे - प्रति हेक्टरी 10 ते 12 किलो बियाणे पुरेसे होते.

**हरभरा (पेरणी पूर्व तयारी)**

सिंचनाची सोय नसलेल्या कोरडवाहू क्षेत्रात, जमिनीत योग्य वापसा आल्यानंतर 10 ऑक्टोबर पर्यंत हरभ-याची पेरणी करा. रब्बी हंगामात कोरडवाहू हरभरा पेरणीसाठी प्रामुख्याने विजय, दिग्विजय, विशाल, विराट, फुले विक्रम आणि फुले विश्वराज हे वाण वापरावे. बिजप्रक्रिया करणे फार आवश्यक असू यासाठी ट्रायकोडर्मा 5 ग्रॅम किंवा थायरम + 2 ग्रॅम कार्बेन्डीझीयम प्रती किलो बियाण्यास चोळावे जेणेकरून संभाव्य बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण मिळेल.

**कांदा (पिक वाडीची अवस्था)**

करपा रोगाच्या नियंत्रणासाठी डायफेनकोनॅझोल 25% ई.सी. 10 मिली 10 लिटर पाण्यात किंवा टेब्युकोनॅझोल 10 मिली प्रती 10 लिटर पाण्यात किंवा ऍझोक्सिस्ट्रोबीन 18.2% + डायफेनकोनॅझोल 11.4% 10 मिली प्रती 10 लिटर पाण्यात किंवा ऍझोक्सिस्ट्रोबीन 11% + टेब्युकोनॅझोल 18.3% 10 मिली प्रती 10 लिटर पाण्यात किंवा किटाझेज 48% इसी 10 मिली प्रती 10 लिटर पाण्यातून 10 ते 15 दिवसांच्या अंतराने आलटून-पालटून फवारावेत. फवारणी करताना स्टिकरचा वापर करावा.

**केळी (पीक वाढीची अवस्था)**

सध्याच्या ढगाळ व पावसाळी हवामानामुळे करपा (सिगाटोका) रोगाच्या नियंत्रणासाठी रोगग्रस्त पानाचा भाग / पाने काढून जाळावीत. तसेच मेटीरम 55 टक्के + पाय-याक्लोस्ट्रोबिन 5 टक्के (60 टक्के डब्लु जी) 30 ग्रॅम 10 लीटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. त्यानंतर 15 ते 20 दिवसांच्या अंतराने 2 फवारण्या कराव्यात. पीक काढणीच्या (निर्यात मालासाठी) अगोदर फवारणी करताना मिनरल ऑईलचा वापर टाळावा. वा-याचा वेग वाढण्याची शक्यता असल्याने झाडे पडू नयेत म्हणून काठीचा आधार द्यावा. पावसाची शक्यता असल्याने शेतातील अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा करावा. सध्याच्या ढगाळ हवामानामुळे फुलकिडीच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड 5 मिली प्रति 10 लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी तसेच फवारणी करताना स्टिकरचा वापर करावा.

**जनावरांचे व्यवस्थापन**

जनावरांचे जंत निर्मूलन करून घ्यावे.  कोवळ्या गवतामुळे होणारी बुळकांडी रोगाकरिता सल्फा गोळ्याचा वापर करावा.  तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असल्याने जनावरांना सुरक्षित ठिकाणी बांधावे.  जनावरांना मोकळ्या जागेत बांधू नये.  त्यांना गोठा, शेड किंवा मजबूत इमारतीत ठेवावे.  ढगाळ वातावरण व वाढलेल्या आद्रतेमुळे बाह्य परोपजीवी (उवा, पिसवा, गोचीड व चावणा-या माशा) कीटकांचा प्रादुर्भाव वाढला असून त्यांच्या व्यवस्थापनासाठी 5% निंबोळी अर्क किंवा वनस्पतीजन्य कीटकनाशक (कडुनिंब तेल 15 मिली + करंज तेल 15 मिली + 2 ग्रॅम साबण 1 लिटर पाणी) हे द्रावण आठवड्याच्या अंतराने पशुधनावर, गोठ्यामध्ये, सोभेवताली असलेले पाण्याचे डबके / खाच खळगे / नाली व उकंड्यावर फवारावे.  हे वनलस्पतीजन्य कीटकनाशक किटरोधक व गोचिडांचे जीवनचक्र तोडून त्यांची संख्या घटविण्यासाठी मदत करतात.

**महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या सोयी सुविधेंचा वापर :**

अन्नधान्य साठवणूकीसाठी तसेच चालु बाजारभाव प्रमाणे विकण्याची इच्छा नसेल परंतु आर्थिक नियोजन करण्यासाठी वखार महामंडळाच्या सुविधांचा वापर करू शकता शक्यतो तालुक्याच्या ठीकाणी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या गोदामांची सुविधा उपलब्ध असते.

**टिप :** शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी / काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.